महाराष्ट्र शासन
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
मंत्रालय (मुख्य इमारत), तळमजला, अभिलेख कक्ष क्र.२२
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
ईमेल : tca-mh@nic.in दूरध्वनी क्र. ०२२-२२०२५६०

क्रमांक:संकीर्ण२०२४/प्र.क्र.२००/आस्थापना दिनांक : १७ डिसेंबर, २०२४

प्रति,

अवर सचिव,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२.

विषय :- सेवानिवृत्त अधिका-यांची करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता जाहिरात देण्याबाबत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, गट-अ/गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अवर सचिव / कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या १ अवर सचिव / कक्ष अधिकारी यांची पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता सोबत जोडलेल्या जाहिरातीबाबतचा अधिक तपशिल व अर्जाचा नमुना शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावा ही विनंती.

आपला,

(सु.दि.पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत :- निवडनस्ती

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

### सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

**विभागाची आवश्यकता :**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयाचा सुधारीत आकृतिबंध मंजूर करणे, क्षेत्रिय कार्यालयाचे सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करणे, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) ची वेबसाईट अद्ययावत करणे, नागरी सेवा पुरविणे, तसेच इतर आस्थापनाविषयक बाबी ( विशेषत: वेतननिश्चिती प्रकरणे, सेवानिवृत्ती संदर्भातील प्रकरणे ) इ. विवक्षित कामकाजांसाठी, आस्थापनाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या, राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या **अवर सचिव / कक्ष अधिकारी** यांचे १ पद, १ वर्षाच्या कालावधीकरीता, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागात करार पध्दतीने भरावयाचे आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती **केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता** सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण - २७१५/ प्र.क्र.१००/ १३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार हा राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून **अवर सचिव / कक्ष अधिकारी या पदावरुन** सेवानिवृत्त झालेला असावा.

३) उमेदवारास आस्थापनाविषयक कामकाजाचा किमान ४ वर्षांचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज दिनांक २७.१२.२०२४ सायंकाळी ०६.१५ वा.पर्यंत "अवर सचिव (आस्थापना), दालन क्र.५२१, विस्तार इमारत, ५ वा मजला, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल, अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीश: आणून द्यावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर करु नये. अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागास राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील तसेच या व्यतिरिक्त विभाग ठरवेल त्या अतिरिक्त अटी व शर्ती संबंधित उमेदवारावर बंधनकारक असतील.

--x--

## अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील
स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :-..................................................................

२. अर्जदाराचा पत्ता :-.................................................................

३. सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-..................................................................

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-..................................................................

५. जन्म दिनांक व वय :-..................................................................

६. विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? :- होय/नाही

७. अनुभव :-

| अ.क्र. | यापूर्वी काम केलेल्या विभागाचे नाव | कालावधी | कामाचे स्वरुप / विषय |
|---|---|---|---|
| | | | |

विशेष उल्लेखनीय काम :- ..................................................................

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचा सुधारीत आकृतिबंध मंजूर करणे, क्षेत्रिय कार्यालयांचे सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करणे, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (खुद्द) ची वेबसाईट अद्ययावत करणे, नागरी सेवा पुरविणे, तसेच इतर आस्थापनाविषयक बाबी (विशेषत: वेतननिश्चिती प्रकरणे, सेवानिवृत्ती संदर्भातील प्रकरणे) अशा विविध विवक्षित कामकाजाकरीता, सहाय्य करण्याकरीता १ वर्षाच्या कालावधीकरीता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी